पुढारी पा.नं.३.

# मिरा-भाईंदरमध्ये नाकाबंदीत ४४ केसेस दाखल

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे व मीरा-भाईंदर परिमंडळाचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या आदेशावरून मीरा-भाईंदर शहरातील सर्व पोलीस ठाण्यात १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान काशिमीरा, काशिगाव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन सागरी पोलीस ठाण्यात ऑल आउट कोंबिंग ऑपरेशन व नाकाबंदी दरम्यान एकूण ४४ केसेस दाखल केल्या आहेत.




मीरा भाईंदर परिमंडळ-१ अंतर्गत असलेल्या ३ सहाय्यक पोलीस आयुक्त व सात वरिष्ठ पोलीस निरीक्षक व १४ पोलीस निरीक्षक, सहा. पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक- ३८ व पोलीस अंमलदार १४० यांनी या कारवाईत सहभाग घेतला. पोलिसांना ऑल आउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान पाहीजे व फरारी असे ७ आरोपी मिळुन आले. त्यांना ताब्यात घेवुन कारवाई करण्यात आली आहे. एन. डी. पी. एस. कायदयान्वये अंमली पदार्थाचे सेवन केल्याबाबत ६ इसमावर गुन्हे दाखल करण्यात आले, ७ इसमावर बी. एन. एस. एस. प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली, दारुबंदी कायद्यान्वये १० गुन्हे दाखल करण्यात आले, कोप्ता अंतर्गत २ एन. सी. दाखल केल्या, १२ हिस्ट्रीशिटर तपासले, ५ तडीपार व्यक्तींना तपासले, ५१ हॉटेल व लॉजेस तपासले.

७ पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. नाकाबंदीच्या वेळी मोटार वाहन कायदया अन्वये ४४ केसेस करण्यात आल्या आहेत.

म.टा. पु.पा.९.

# नरेंद्र मेहता यांच्या कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## बोगस पत्राद्वारे हुसेन यांची बदनामी केल्याचे प्रकरण

मिरा-भाईंदर विधानसभा क्षेत्राचे भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांचे तीन समर्थक कार्यकर्ते आणि दोन अनोळखी अशा पाच जणांवर बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काँग्रेसचे उमेदवार मुझफ्फर हुसेन यांची एका बनावट पत्राद्वारे बदनामी व धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी मिरारोड पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी याकूब मेमन यांची फाशीची शिक्षा माफ कारण्याची मागणी अशा आक्षेपार्ह मजकुराखाली एक पत्र काही जणांकडून समाजमाध्यमांवर पसरवले जात आहे. काँग्रेसच्या काही आमदारांकडून राष्ट्रपतींकडे ही मागणी करण्यात आल्याचे पत्रात दर्शविण्यात आले आहे. यात मुझफ्फर हुसेन यांचे नाव आणि बोगस स्वाक्षरी दाखवली आहे.

या बोगस पत्राद्वारे हुसेन यांची बदनामी आणि दोन समाजात तेढ निर्माण केली जात असल्याची तक्रार त्यांचे वकील राहुल राय यांनी केली होती.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पा. ४.

# नालासोपाऱ्यात सुविधांची वानवा

## बेकायदा बांधकामांचे पेव; वाढत्या नागरीकरणाचा फटका




### मतदारसंघाची रचना

नालासोपारा विधानसभा मतदारसंघ हा पालघर लोकसभा मतदारसंघाचा एक भाग आहे. नालासोपारा पूर्व पश्चिम, विरार, मनवेल पाडा, वसंत नगरी सोपारा गाव असा हा विस्तारलेला मतदार संघ आहे. सर्वाधिक मतदार या मतदारसंघात आहेत. विशेषतः या मतदारसंघात उत्तर भारतीय मतदारवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीसाठी नालासोपारा मतदारसंघात ५११ मतदान केंद्रे असून सहा लाखांहून अधिक मतदार आहेत.



लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** कोकण प्रांताची राजधानी आणि ऐतिहासिक शूर्पारक नगरी अशी ओळख असलेल्या नालासोपारा शहराची आज अक्षरशः बजबजपुरी झाली आहे. सर्वाधिक गर्दीचे आणि परप्रांतियांचे शहर म्हणून नालासोपारा आता ओळखले जात आहे. बेकायदा बांधकामे, गुन्हेगारी, पायाभूत सुविधांचा अभाव, फेरीवाल्यांची समस्या, सततची वाहतूक कोंडी अशा विविध समस्यांनी हे शहर ग्रासले आहे.

नालासोपारा शहराची मतदारसंख्या ६ लाखांहून अधिक आहे. वसई-विरार मधील सर्वाधिक लोकसंख्या या नालासोपारा शहरात राहते. नालासोपारा मतदारसंघात मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत. त्यामुळे येथे परप्रांतियांची घुसखोरी वाढत आहे. बेसुमार बांधकामे उभी राहिल्याने अनेक नवनवीन वसाहती, वस्त्या विकसित होऊ लागल्या. बिहार, उत्तरप्रदेश येथील सर्वाधिक कष्टकरी जनता येथे येऊन स्थिरावत आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे पायाभूत सुविधा पुरविण्यावर मोठा परिणाम दिसून येत आहे. नालासोपारा पूर्व-पश्चिम अशा दोन्ही भागांत फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून पदपथ, रस्ते गिळंकृत केले आहेत. त्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. आधीच रस्ते अपुरे आहेत त्यातच फेरीवाल्यांच्या समस्येमुळे नागरिकांना या भागात चालण्यासाठी देखील जागा मिळत नाही. बेकायदा बांधकामांमुळे वीज चोरीचे प्रमाण वाढले आहेत. क्षमतेपेक्षा अधिक वीज जोडण्या देण्यात आल्याने वीज वितरण व्यवस्थेवर मोठा ताण येत आहेत. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. याचा त्रास या भागातील नागरिकांना सहन करावा लागत आहे.

नालासोपारा शहरात विविध ठिकाणी बकालपणा दिसून येत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर जागोजागी कचऱ्याचे ढीग, गटाराचे सांडपाणी, नाल्यात कचरा टाकण्याचे प्रकार यामुळे येथील बकालपणा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे येथील नागरी आरोग्य धोक्यात आहे. तसेच दाटीवाटीने तयार झालेल्या बेकायदा चाळींमध्ये बोगस डॉक्टरांचे प्रमाण वाढले आहे. नैसर्गिक नाले, पाणी जाण्याचे मार्ग बंद करण्यात आल्याने दरवर्षी नालासोपारा परिसरातील बहुतांश भाग हा पाण्याखाली जातो. अवघ्या तासभर पाऊस झाला तरीही नालासोपारा जलमय होऊन येथील जनजीवन विस्कळीत होते. नालासोपारा मतदारसंघाचा सुनियोजित विकास न केल्याने नागरिकांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

### गुन्हेगारीत वाढ

नालासोपारा शहर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांसाठीचे आश्रयस्थान झाले आहे. त्यामुळे भूमाफिया, गुंड यांनी परिसरात थैमान घातले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटना, दंगल, हत्या, चोरी, अपहरण यासह विविध प्रकारचे गुन्हे या भागात घडत असल्याचे अनेकदा समोर येत आहेत. अमली पदार्थांची तस्करीही येथे मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

### पर्यटन विकास गरजेचा

नालासोपारा मतदारसंघात बौद्ध स्तूप, राजोडी समुद्र किनारा, देवी देवतांची मंदिरे, धार्मिक स्थळे आहेत. मात्र त्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास साधला गेला नाही.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु-पा-१.



# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा 'रूट मार्च'

## वसई, नालासोपाऱ्यामध्ये कोणताही अनुचित प्रकार न घडण्यासाठी खबरदारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी विरार पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रूट मार्च काढला होता. निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी हा रूट मार्च काढण्यात आला होता.

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर वसई, नालासोपारा विधानसभा मतदार संघात पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. निवडणुकीच्या काळात बेकायदा मद्यविक्री, त्याची वाहतूक तसेच इतर गुन्हेगारी कारवाया होण्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. संशयित व्यक्तींना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येत आहे. शांतता सुव्यवस्था अबाधित राहावी, राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हावी याशिवाय नागरिकांनी भयमुक्त वातावरणात मतदानासाठी बाहेर पडावे यासाठी विरार पोलिसांनी विरार पूर्वेकडून मनवेल पाडा रस्त्याच्या मार्गाने राणी तलाव निलगिरी टॉवर, जीवदानी रस्ता, हिल पार्क चौकीमार्गे वीर सावरकर मार्गाच्या मुख्य बाजारपेठेतून साईबाबा मंदिरमार्गे रूट मार्च काढण्यात आला.

यात पोलीस अधिकारी, अंमलदार, शिपाई यासह इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक कालावधीत कुठल्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही व निवडणूक शांततेत पार पाडाव्यात याबाबत सूचना करण्यात आल्या असे प्रभारी निरीक्षक सुरेश गायकवाड यांनी सांगितले. जर एखादा अनुचित प्रकार घडत असेल त्याची माहिती सुद्धा पोलिसांना देण्यात यावी असे आवाहन ही नागरिकांना करण्यात आले.

# मिरा-भाईंदरमध्ये 'ऑल आऊट' मोहीम

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू झाल्यानंतर मिरा-भाईंदरमधील पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. पोलिसांकडून शहरभरात 'ऑल आऊट', कोंबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी मोहीम राबवण्यात येत आहे.

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयामार्फत शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून ५ नोव्हेंबरपासून 'ऑल आऊट' मोहीम सुरू केली आहे. यात परिमंडळ १ चे उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्यासह तीन सहायक आयुक्त, १४ वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले आहेत.



या कारवाईदरम्यान अभिलेखावरील वॉन्टेड व फरार असलेले आरोपी तपासण्यात येत आहेत. त्यात सात आरोपी विविध गुन्ह्यांत फरार आणि विविध गुन्ह्यांत आरोपी असलेल्यांना अटक करण्यात आली आहे. एनडीपीएस कलमांतर्गत सहा जणांवर कारवाई करण्यात आली. तसेच दारूबंदी कायद्याअंतर्गत १० गुन्हे दाखल करण्यात आले. मिरा रोड, भाईंदर, नवघर, काशिमीरा, नया नगर, उत्तन व काशिगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन पार पडले.

याशिवाय १७ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. यामध्ये ५१ हॉटेलची तपासणी आणि ४४ दुचाकी आणि चारचाकी वाहने तपासण्यात आली, यावेळी मोटार वाहन कायदा कलमांतर्गत १४९ चालकांवर कारवाई करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.पा.२.

# शस्त्रांसह नागपूरच्या तरुणाला मीरा-भाईंदरमधून अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा भाईंदरच्या गुन्हे शाखा कक्ष १ ने मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील एका हॉटेलमधून ४ पिस्तूल व ८ जिवंत काडतुसांसह नागपूरवरून आलेल्या व्यक्तीस अटक केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा पकडला गेल्याने नेमकी ही शस्त्रे कशासाठी आणली होती असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महामार्गावरील वेस्टर्न हॉटेलमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीकडे विनापरवानगी गावठी पिस्तूल असल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, स.पोलिस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे व पुष्पराज सुर्वेसह निखिल चव्हाण, संदीप शिंदे, राजू तांबे, पुष्पेंद्र थापा, समीर यादव, सचिन हुले, प्रशांत विसपुते, गौरव बारी, सौरभ इंगळे, मसुबचे किरण असवले यांच्या पथकाने धाड टाकून परमानंद रमेश म्हात्रे (२७, रा. नागपूर) याला अटक केली. त्याच्याकडे ४ गावठी पिस्तूल व ८ जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा आढळला आहे. २ लाख ८ हजारांचा हा साठा जप्त केला असून काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## कोम्बिंग ऑपरेशनमध्ये सात फरारी अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमध्ये पोलिसांनी ठिकठिकाणी केलेल्या ऑल आउट कोम्बिंग ऑपरेशनमध्ये ७ फरारी आरोपी सापडले तर नाकाबंदीत मोटार वाहन कायद्याखाली ४४ केसेस केल्या गेल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे, अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे व मीरा भाईंदर परिमंडळचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या आदेशानुसार मीरा-भाईंदर शहरातील सर्व ७ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान ऑल आउट कोम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदी केली गेली होती. तीन सहायक पोलिस आयुक्त व सात वरिष्ठ पोलिस निरीक्षक, १४ पोलिस निरीक्षक, ३८ सहायक पोलिस निरीक्षक व पोलिस उपनिरीक्षक, १४० पोलिस अंमलदार यांनी ही कारवाई केली.

ऑलआउट कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान सात फरारी आरोपी सापडले. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. अमली पदार्थाचे सेवन केल्याबाबत ६ जणांवर तर दारूबंदी कायद्यानुसार १० गुन्हे दाखल केले गेले. ७ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. गुन्ह्यांचा रेकॉर्ड असलेले १२ हिस्ट्रीशिटर व ५ तडीपारांना तपासले. ५१ हॉटेल व लॉज तपासले गेले. ७ पोलिस ठाणे हद्दीत केलेल्या नाकाबंदीत मोटार वाहन कायद्यान्वये ४४ केसेस करण्यात आल्या आहेत.

लोकमत ५.पा.१.

## तरुणीची आत्महत्या

वसई : प्रेमसंबंधाला कुटुंबियांचा विरोध असल्याने नैराश्यात गेलेल्या २० वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

तरुणी ही विरार पश्चिमेला बोळिंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत आईवडील आणि बहिणीसोबत रहात होती. तरुणीच्या प्रेमसंबंधास कुटुंबीयांचा विरोध होता. त्यामुळे ती निराश होती. अखेर बुधवारी दुपारी तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत तरुणीच्या बहिणीने बोळिंज पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे.

## दुचाकी चोराला अटक

भाईंदर : वसई-विरार शहरात वाहन चोरी करणाऱ्या आरोपीला मध्यवर्ती गुन्हे शाखेने अटक केली आहे. अरबाहुसेन शेख असे अटक आरोपीचे नाव असून त्याच्याकडून तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

माणिकपूर, भोईवाडा पोलीस ठाण्यात दाखल असलेले तीन गुन्हे उघड झाले आहेत.

## ११ व्या मजल्यावरून पडून तरुणीचा मृत्यू

वसई : विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथे इमारतीच्या ११ मजल्यावरून पडल्याने २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला.

श्रेया सिंग (२१) ही तरुणी विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथील बचराज लॅण्डमार्क या इमारतीच्या ११ व्या मजल्यावर कुटुंबीयांसमवेत राहात होती. दिवाळीनिमित्त सिंग कुटुंबीयांनी आपल्या घराच्या गॅलरीत आकाशकंदील लावला होता. बुधवारी रात्री ती गॅलरीत लावलेला कंदील काढत होती. त्यावेळी तिचा तोल गेला आणि ती खाली पडली.

तिला उपचारासाठी विरारच्या संजीवनी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी बोळिंज पोलिसांनी अपमृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा.३.

शहरात सात नवे उड्डाणपूल मंजूर

# वसई-विरारकरांची वाहतूककोंडीतून होणार सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार शहर महापालिकेतील वाढती लोकसंख्या आणि रस्त्यावरील वाढती वाहतूककोंडी लक्षात घेता शहरात नव्या वाहतूक यंत्रणेची आवश्यकता होती. तेच लक्षात घेता वसई-विरार शहर मनपा कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी ७ उड्डाणपूल बांधण्याचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच या उड्डाणपुलाच्या कामांना वेग येणार आहे. शहरात होणाऱ्या या नियोजित पुलांमुळे शहरातील नागरिकांची वाहतूककोंडीतून सुटका होणार आहे.



वसई-विरार शहरातील अनेक रस्त्यांवर मोठी वाहतूककोंडी होते.

## लवकरच होणार पुलाची कामे सुरु

या पुलाच्या कामांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रशासकीय मान्यता मिळाली असून, लवकरच ही कामे सुरु होणार आहेत. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात विरार, नालासोपारा, वसई आणि नायगाव, अशी पश्चिम रेल्वेची तीन स्थानके येतात, मात्र पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या उड्डाण पुलांची संख्या कमी असून, त्यामुळे वाहतुकीवर ताण पडत होता. संध्याकाळच्या वेळेस अधिक वाहतूककोंडी होते. अशा ठिकाणची कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल उभारले जाणार आहेत. जेणेकरून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल आणि नागरिकांच्या वेळेची व इंधनाचीही बचत होईल.

### मंजूर झालेले उड्डाणपूल

१) रेंज ऑफिस, गोखिवरे, वसई (पूर्व)
२) चंदननाका जंक्शन, नालासोपारा (पूर्व)
३) बोळींज खारोडी नाका ते सायन्स गार्डन, विरार (पूर्व)
४) मनवेलपाडा नाका ते फुलपाडा जंक्शन, विरार (पूर्व)
५) माणिकपूर ते बाभोळा नाका, वसई (पश्चिम)
६) वसंत नगरी ते एव्हरशाईन, गोखिवरे वसई रोड (पूर्व)
७) नारिंगी (साईनाथ नगर) विरार

लोकमत पु.पा.१.

# खोटे पत्र व संदेशप्रकरणी मीरा रोडला गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात खोटी स्वाक्षरी आणि खोटे पत्र समाजमाध्यमांवर व्हायरल करून महाविकास आघाडीच्या उमेदवारास दहशतवाद्याला सहकार्य करणारा तसेच धार्मिक द्वेषाचे संदेश व्हायरल केल्याप्रकरणी भाजपच्या कार्यकर्त्यासह एकूण पाचजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या वतीने काँग्रेसचे मुझफ्फर हुसेन निवडणूक लढवत आहेत. भाजपच्या माजी नगरसेवक, कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच अन्य काहींनी समाजमाध्यमांवर बॉम्ब स्फोटातील आरोपी याकूब मेमन याची फाशीची शिक्षा रद्द करा, अशी मागणी करणारे आणि त्यात सही करणाऱ्यांत तत्कालीन आमदार मुझफ्फर हुसेन यांचे खोटे नाव व स्वाक्षरी असलेले खोटे पत्र समाजमाध्यमांवर व्हायरल केले गेले. त्यात मुझफ्फर यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा संदेश व्हायरल केला.




### आचारसंहितेचा भंग

- याप्रकरणी मुझफ्फर यांच्या वतीने त्यांचे वकील राहुल राय, ॲड. श्याम शहारे आदींनी कारवाईची मागणी केली. पोलिस, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाकडे तक्रारी केल्या. हा प्रकार आदर्श आचारसंहितेचा भंग आहे.
- खोटे पत्र व खोटी स्वाक्षरी करून ते आक्षेपार्ह मजकुरासह व्हायरल करणाऱ्या आणि ते तयार करणाऱ्या भाजपच्या संबंधित माजी नगरसेवक, कार्यकर्ते यांच्यावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी तक्रारीत केली होती.
- मीरारोड पोलिस ठाण्यात भाजपाचे पदाधिकारी-कार्यकर्ते जेरॉम डिसोझा, कृणाल शुक्ला, गणेश मुरुगन, दी फेकिंग फॅक्टस एक्स पेज, आमची मुंबई इन्स्टा पेज यांच्यावर याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

# तरुणाची आत्महत्या

नालासोपारा : नायगावच्या वाकीपाडा येथील आराधना वेल्फेअर सोसायटीत राहणाऱ्या राहुल शर्मा (वय २१) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने मंगळवारी राहत्या रूमच्या छताला असलेल्या लोखंडी पाइपला दोरीच्या साहाय्याने खुर्चीवर चढून गळफास घेतला आहे. नायगाव पोलिसांनी बुधवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. नायगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा.१.

# बिल्डिंगवरून पडल्याने मृत्यू



नालासोपारा : विरारच्या ग्लोबल सिटीतील बचराज लँडमार्क या इमारतीत राहणाऱ्या श्रेया सिंग (वय २१) या तरुणीचा बिल्डिंगवरून पडल्याने मृत्यू झाला आहे. श्रेया ही बुधवारी सकाळी घराच्या गॅलरीमधील दिवाळीसाठी लावलेला आकाश कंदील स्टुलवर उभी राहून काढत होती. तिचा गॅलरीमधून तोल जाऊन ११ मजल्यावरून खाली पडल्याने डोक्याला व शरीरावर इतरत्र जबर दुखापत झाली होती. तिला उपचारासाठी संजीवनी हॉस्पिटलमध्ये नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले आहे. बोळींज पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. बोळींज पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# तरुणीची आत्महत्या

नालासोपारा : विरारच्या ग्लोबल सिटीतील अग्रवाल पॅरामाऊंट इमारतीत राहणाऱ्या दीपा यादव (वय २०) या तरुणीने आत्महत्या केली आहे. तिचे एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. घरच्यांनी तिला त्याला भेटू नको असे सांगितले होते. याच रागातून दीपाने बुधवारी दुपारी नैराश्येपोटी बेडरूममधील पंख्याला गमच्याच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. बोळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

सामना पा.नं.५.

# फेक मेसेज पाठवून सोशल मीडियावर बदनामी

भाईंदर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियाच्या माध्यमातून चुकीचे, निराधार, फेक मेसेज पसरवून बदनामी केली जात असल्याचा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसेन यांचे वकील राहुल राय यांनी केला आहे. मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात आचारसंहितेदरम्यान जातीधर्मात तेढ निर्माण करणारे मेसेज समाजकंटक पसरवत आहेत. त्यामुळे दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी. ॲड. राहुल राय यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

# नालासोपारा, विरारमधून सहा कोटी जप्त

वसई : विधानसभा निवडणुकीची सर्वत्र धामधूम सुरू असतानाच आज नालासोपारा व विरारमधून ६ कोटी ३० लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. सीएमएस कनेक्टिंग कॉमर्स या कंपनीच्या दोन व्हॅन पोलिसांनी जप्त केल्या असून याप्रकरणी दोन जणांना ताब्यात घेतले आहे. नालासोपारा एसटी आगाराजवळ एका संशयास्पद व्हॅनची झडती पोलिसांनी घेतली असता त्यात ३ कोटी ५० लाखांची रोख रक्कम आढळून आली, तर विरारमधील मांडवी येथे पकडलेल्या व्हॅनमधून २ कोटी ८० लाख रुपये पोलिसांनी जप्त केले. पकडलेल्या पैशांचा हिशेब लागत नसल्याने संशय बळावला आहे. दरम्यान पनवेलच्या पळस्पे फाटा येथेही पोलिसांनी दोन लाखांची रक्कम पकडली.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पा. नं. ४.

# गावठी हातभट्टीवर गुन्हे शाखेची धाड



। वसई : नालासोपारा पूर्वेकडील डोंगरात गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर धाड टाकून गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-३ ने लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला आहे. सागपाडा, डोंगरपाडा लगतच्या जंगलात बेकायदा गावठी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या दोन मोठ्या भट्ट्या असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष-३ ला मिळाली होती. त्यानुसार धाड घालून १५२० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश, दोन तांबा धातूच्या टाक्या, दोन तांबा धातूचे थाळीचा टाव (सतेले), दोन लाकडी चाटू अशी दारु तयार करण्याची साधने जप्त करण्यात आली.या साहित्याची किंमत १ लाख ५६ हजार असल्याचे सांगण्यात आले. सर्व साहित्य नष्ट करण्यात आले. गुन्हे शाखेचे तुषार दळवी यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा नोंद करण्यात आला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील यांनी ही कारवाई केली.

पुण्यनगरी पा. नं. ७.

# बेहिशेबी ३.५ कोटी हस्तगत




## गोरेगावहून निघालेली कंपनीची व्हॅन जप्त

। वसई : नालासोपारात फिरणाऱ्या संशयास्पद सीएमसी कंपनीच्या व्हॅनमधून बेहिशेबी ३.५ कोटी रुपये गुन्हे शाखेने हस्तगत केले आहेत. गुरुवारी दुपारी १२.३०च्या सुमारास नालासोपारा पश्चिम एसटी स्टँड रोडवर सीएमएसी कंपनीची व्हॅन फिरताना गुन्हे शाखे कक्ष-३ ला आढळली. व्हॅनला अडवून गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने तिची तपासणी केली असता, त्यात दोन व्यक्ती आणि एक चालक सुमारे ३.५ कोटी रुपयांच्या बेहिशेबी रोकडसह आढळून आले. त्यामुळे या सर्वांना नालासोपारा पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

कॅशची मॅनेजमेंट करणाऱ्या, तसेच एटीएममध्ये कॅश भरणाऱ्या सीएमएस कंपनीच्या व्हॅनमध्ये ही रोकड आढळली. मात्र तिचा तपशील संबंधित व्हॅनमध्ये असलेल्या अधिकाऱ्यांकडे मिळाला नाही. त्यांच्याकडे फक्त ५४ लाखांचा हिशेब मिळाला. गोरेगावहून कॅश घेऊन निघालेली व्हॅन विरार येथे जाणार असल्याचे व्हॅनमधील व्यक्तींनी पोलिसांना सांगितले. या घटनेची माहिती मिळाल्यावर माजी सभापती अतुल साळुंखे, माजी उपमहापौर उमेश नाईक यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात धाव घेतली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इतकी मोठी रक्कम एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यात येते, तसेच तिचा तपशील लागत नाही, यावर संशय व्यक्त करून उमेश नाईक यांनी याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी पोलिसांकडे केली.

# स्वीमिंग पूलमध्ये बुडून तरुणाचा मृत्यू

। वसई : अर्नाळा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील विसावा रिसॉर्टच्या स्वीमिंग पूलमध्ये बुडून २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नालासोपारा येथे राहणारे शेषमणी पाल यांच्याकडे उत्तर प्रदेशातील पाहुणे आले होते. हे चार पाहुणे अर्नाळा येथील विसावा रिसॉर्टमध्ये सहलीसाठी गेले होते. स्विमिंग पूलमध्ये पोहोण्यासाठी सर्वजण उतरले होते. यावेळी सत्येंद्र कुमार याने पाण्यात सुर मारला, पण तो वर आला नाही. त्यामुळे त्याला पाण्याबाहेर काढण्यात आले, तेव्हा तो बेशुद्धावस्थेत होता. त्याला उपचारासाठी नजीकच्या महालक्ष्मी इस्पितळात दाखल करण्यात आले होते. तिथून सिटीस्कॅन करण्यासाठी संजीवनी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी अर्नाळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पंकज किलजे करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पा-नं२.

पुढारी पा.नं.५.

# नालासोपाऱ्यात एटीएम व्हॅनमध्ये ३.५ कोटी!

## कागदोपत्री फक्त ४५ लाखांची नोंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** गुरुवारी दुपारी गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पथकाला निवडणूक गस्तीदरम्यान एटीएमला पैसे पुरविणाऱ्या वाहनात तब्बल साडेतीन कोटींची रक्कम सापडली. सिव्हिक सेंटरजवळ ताब्यात घेतलेल्या या वाहनात फक्त ४५ लाख रुपयांची रोकड असल्याची नोंद होती. या पार्श्वभूमीवर संबंझित रकमेसह वाहन ताब्यात घेण्यात आले.

नालासोपाऱ्यातील सिव्हिक सेंटरजवळ गुरुवारी दुपारी ३ च्या सुमारास एका एटीएम व्हॅनमध्ये संशयास्पद रोकड येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा-३ च्या पथकाला मिळाली होती. पोलिसांच्या पथकाने ही व्हॅन थांबवली असता बँकेच्या एटीएममध्ये भरण्यासाठी ही रक्कम आणल्याचे त्यातील दोघांनी सांगितले. मात्र, व्हॅनमध्ये असलेल्या साडेतीन कोटी रुपयांचा हिशेब जुळत नसल्याने या रकमेबाबत संशय निर्माण झाला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे घटनास्थळी हजर झाले.

घटनेची माहिती मिळताच बविआचे कार्यकर्ते पोलिस ठाण्यात जमा झाले. आढळलेल्या रकमेपैकी केवळ ४५ लाखांचा हिशेब जुळत आहे.

उर्वरित रोकड कुणासाठी आणली? कुणी आणली? त्याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी बविआचे नेते उमेश नाईक यांनी केली आहे.

### तांत्रिक चुकांमुळे घडला प्रकार?

१ सीएमएस नावाच्या कंपनीची गाडी मीरा-भाईंदर, वसई-विरार परिसरात बँकांच्या एटीएममध्ये पैसे भरण्याचे काम करते. मात्र, या कंपनीने निवडणूक आयोगाने निवडणूक काळासाठी जारी केलेले नियम पाळले गेले नसल्याचे दिसून आले आहे.

२ पकडलेल्या गाडीच्या कागदपत्रांवर ४५ लाख रुपये असल्याची नोंद आहे; पण गाडीत साडेतीन कोटींच्या आसपास रक्कम आढळून आलेली आहे. पंचनामा झाल्यावर नेमकी किती रक्कम आहे, हे कळू शकेल. मात्र, या प्रकरणात राजकीय पक्षाचा कोणताही संबंध नसून हे बँकेचेच पैसे असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी 'लोकमत'ला सांगितले. काही तांत्रिक चुका झाल्याने हा प्रकार झाल्याचा दावा करण्यात येत आहे.

---

# तरुणाला ठार मारण्याचा प्रयत्न

**। वसई :** नायगावच्या तरुणाला रिक्षाखाली चिरडून ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली असून, याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जूचंद्र-चंद्रपाडा येथील नीलेश परेट या रिक्षाचालकाबाबत ही घटना घडली आहे. नीलेश हा आरोपी गणेश पवार याच्या मैत्रिणीशी फोनवर बोलत असे. त्यामुळे दोघांत वाद झाला होता. तेव्हापासून गणेशने नीलेशवर राग धरला होता. सोमवारी रात्री १२.३०च्या सुमारास चंद्रपाडा नाक्यावर गणेशने नीलेशला गाठले आणि निलू, चल रिक्षात बस, असे दरडावले. प्रसंग लक्षात आल्यावर नीलेशने नकार दिल्यामुळे संतप्त झालेल्या गणेशने त्याच्या शर्टाची कॉलर पकडून शिवीगाळ केली. त्यावेळी त्याच्या तावडीतून सुटून नीलेशने घरी जाण्याचा प्रयत्न केला असता, त्याला ठार मारण्याच्या उद्देशाने रिक्षाने धडक देऊन चिरडण्याचा प्रयत्न केला. यात नीलेशला गंभीर दुखापत झाल्यामुळे गणेश पळून गेला. नंतर नीलेशने नायगाव पोलीस ठाणे गाठल्यावर याप्रकरणी गणेशवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर गुन्हा

**। मीरा रोड :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार मुझफ्फर हुसैन यांची बदनामी करणारे फेक मेसेज सोशल मीडियावर प्रसारित करून धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या जेराम डिसूजा, कुणाल शुक्ला, गणेश मुरुगन व आमची मुंबई इन्स्टा पेज, दि फिटिंग फाईटस पेज यांच्याविरुद्ध मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुझफ्फर हुसैन यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी सोशल मीडियावर फेक मेसेज प्रसारित करण्याचा प्रयत्न यापुढे झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा ॲड. श्याम सहारे यांनी दिला आहे.

Scanned with OKEN Scanner

NBT पा.नं.2.

# मजदूरों की हुई मौत से सीख नहीं ले रही मनपा!

## निर्माण स्थलों पर सुरक्षा की हो रही है अनदेखी

■ निसं, नालासोपारा: वसई-विरार में मनपा अधिकारी विधानसभा चुनाव में व्यस्त है। अधिकारियों की चुनावी व्यस्तता से जहां भूमाफिया की सक्रियता बढ़ी है, तो वही निर्माण कार्यों मे सुरक्षा की अनदेखी के कारण मजदूरों को अपनी जान गंवानी पड़ रही है। लेकिन इस तरह की घटनाओं की रोकथाम के लिए मनपा प्रशासनकोई कदम नही उठा रहा। पिछले दिनों कामन इलाके मे एक निर्माण के दौरान 22 वर्षीय महिला मजदूर की दीवार ढह जाने से दबकर मौत हो गई थी। नायगांव पुलिस ने छह लोगों के खिलाफ केस दर्ज किया था। पहले भी इस तरह के हादसों में कई मजदूरों की मौत हो चुकी है, लेकिन प्रशासन ने कोई सबक नही लिया।



**अवैध निर्माण की रोकथाम में विफलता**

**अधिकारी बनाते है बहाना:** बता दें कि पिछले दो वर्षो में वसई-विरार और नालासोपारा मे निर्माण के दौरान आठ मजदूरों की मौत हो चुकी है। शहर में अवैध निर्माण की घटनाएं भी बढ़ी है। शहर के कई इलाकों में मजदूरों को जान जोखिम में डालकर निर्माण कार्यों में लगना पड़ता है। स्थानीय लोगों का कहना है कि अधिकारी चुनाव में ड्यूटी का बहाना बताकर कार्रवाई नही करते। इस संबंध में अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले व अतिक्रमण विभाग के उपायुक्त अजित मुठे से संपर्क किया गया, लेकिन उन्होंने फोन नही उठाया।

**सुरक्षा की होती है अनदेखी:** मनपा के प्रभाग कार्यालय (एफ) के पेल्हार और प्रभाग कार्यालय (जी) के वालीव मे बड़े पैमाने पर अवैध निर्माण की शिकायतें मिल रही है। निर्माण कार्य के दौरान मजदूरों को बिना सेफ्टी के ही काम करना पड़ता है। मजदूरों के पास किसी भी प्रकार के सुरक्षा इंतजाम नही है। पिछले दिनों यहां पर दीवार ढह जाने से दो मजदूरों की मौत हुई थी, जबकि तीन मजदूर गंभीर रूप से घायल हुए थे।

शिवसेना यूबीटी के नेता सुरेन्द्र सिंह ने आरोप लगाया कि अवैध निर्माणो की रोकथाम करने मे मनपा अधिकारी विफल रहे है, शिकायत के बाद भी कार्रवाई करने से बचते है। हाल ही मे एक महिला मजदूर की मौत हुई थी, जिसके बाद शिवसेना पदाधिकारियो की शिकायत पर नायगाव पुलिस ने मामले को संज्ञान मे लेते हुए छह लोगो के खिलाफ केस दर्ज किया था। इससे पहले भी अवैध निर्माणो के दौरान हुए हादसो मे कई मजदूरो की मौत हो चुकी है, फिर भी मनपा कोई सीख नही ले रही।

# एटीएम सेंटर में पांच घंटे तक बजता रहा अलार्म!

■ निसं, विरार: फूलपाडा स्थित केनरा बैंक के एटीएम का सुरक्षा अलार्म गुरुवार की सुबह अचानक बजने लगा। लगभग 5 घंटे तक अलार्म लगातार बजता रहा। इतने देर तक अलार्म बजने के बावजूद मौके पर न तो बैंक कर्मचारी पहुंचे और न ही पुलिस टीम ही पहुंच पाई।

**मौके पर न तो बैंक कर्मी पहुंचे और न ही पुलिस**

बता दें कि विरार पूर्व के फूलपाड़ा इलाके में केनरा बैंक का एटीएम है। इस एटीएम सेंटर के बाहर कोई सुरक्षा गार्ड नहीं था। गुरुवार की भोर करीब तीन बजे अचानक एटीएम केंद्र का चेतावनी अलार्म बजने लगा। शुरुआत में जब अलार्म बजा, तो स्थानीय लोगों को लगा कि एटीएम सेंटर में कोई अनहोनी हो गई है। सुबह 3 बजे से 10 बजे तक यह अलार्म 5 घंटे तक लगातार बजता रहा। स्थानीय लोगों ने इसकी सूचना पुलिस के कंट्रोल नंबर पर दी थी। लेकिन पुलिस मौके पर नहीं आई। बैंक को भी सूचित किया गया, लेकिन वहां से भी कोई बैंक कर्मी नहीं पहुंच सका। लगातार 5 घंटे तक बजते रहे इस अलार्म से स्थानीय लोगों को काफी परेशानी हुई। हालांकि, पुलिस ने कहा कि ऐसी किसी घटना का हमारे पर कोई रेकॉर्ड नहीं है। सहायक पुलिस निरीक्षक सोनवलकर ने बताया कि हमें बैंक से कोई शिकायत नही मिली है। बैंक मैनेजर अभिलाष मिश्रा ने बताया कि स्थानीय शाखा से जानकारी ली जाएगी।

## फटाफट खबरें


### युवती ने फांसी लगाकर की ख़ुदकुशी

■ निसं, विरार: बोलिंज पुलिस स्टेशन क्षेत्र के ग्लोबल सिटी मे बुधवार को 21 वर्षीय युवती ने फांसी लगाकर ख़ुदकुशी कर ली। मृतक का नाम दीपा गिरिजाशंकर यादव है। आत्महत्या के कारणो का पता नही चल सका है।

### 11वीं मंजिल से गिर कर युवती की मौत

■ निसं, विरार: ग्लोबल सिटी इलाके मे बुधवार की दोपहर 11वी मंजिल से गिरकर 21 वर्षीय युवती की मौत हो गई। बताया जा रहा है कि श्रेया अजय कुमार सिंह (21) दिवाली के लिए लगाए गए कंदील को निकाल रही थी, तभी उसका संतुलन बिगड़ गया और वह गिर पड़ी। उसे निजी अस्पताल मे भर्ती कराया गया, जहां डॉक्टरो ने उसे मृत घोषित कर दिया।

### विरार व नालासोपारा में पकड़ी गई वैन, करोड़ों रुपये जब्त



■ निसं, विरार: मांडवी पुलिस स्टेशन व नालासोपारा पुलिस स्टेशन क्षेत्र में दो एटीएम वैन में करोड़ों रुपये मिला है। पुलिस ने दोनों वैन को कब्जे में लेकर जांच शुरू की है। गुरुवार की दोपहर क्राइम ब्रांच यूनिट 3 की टीम क्षेत्र में पेट्रोलिंग कर रही थी। तीन बजे उन्हें एसटी डिपो के पास एक एटीएम वैन में संदिग्ध कैश होने की सूचना मिली। टीम ने वैन और उसमें सवार दो लोगों को हिरासत में लेकर पूछताछ की, लेकिन इनके पास वैन मे रखी गई रकम का कोई हिसाब नही था। यह वैन गोरेगांव से विरार आई थी। डीसीपी अविनाश अंबुरे जांच कर रहे है। मांडवी पुलिस ने भी वज्रेश्वरी रोड पर नाका बंदी के दौरान एक संदिग्ध कैश वैन को रोका, जिसमे दो लोग सवार थे। वैन मे 2 करोड़ 80 लाख कैश थे, जिसके बारे मे कोई जवाब नही देने पर पुलिस ने वैन को कब्जे मे ले लिया। मीरा रोड मे नयानगर पुलिस ने भी दो एटीएम वैन से 1 करोड़ 47 लाख रुपये जब्त किए है।

Scanned with OKEN Scanner

# 4 देशी कट्टे के साथ बदमाश अरेस्ट



■ भाईदर, (सं). एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत काशीमीरा क्राइम ब्रांच यूनिट - 1 को विधानसभा चुनाव की सरगर्मी के बीच एक बड़ी सफलता मिली है. मुंबई अहमदाबाद हाइवे मार्ग पर काशीमीरा पुलिस थाने की सीमा में स्थित वेस्टर्न हॉटिल के एक कमरे में पुलिस ने छापा मारकर चार देशी कट्टे के साथ एक शातिर अपराधी को गिरफ्तार किया है. आगामी विधानसभा चुनाव के मद्देनज़र शहर में सुरक्षा व्यवस्था को लेकर मीरा भाईंदर वसई विरार पुलिस काफी सजग है. इसी कड़ी में बुधवार को सहायक पुलिस निरीक्षक क्राइम ब्रांच ( यूनिट-1 ) प्रशांत गांगुर्डे को गुप्त सूचना मिली थी कि कोई संदिग्ध व्यक्ति अवैध हथियारों के साथ वेस्टर्न हॉटिल में ठहरा हुआ है.

**गुप्त सूचना पर होटल पर मारा छापा:** उन्होंने इसकी सूचना अपने वरिष्ठ अधिकारियों को दी और वरिष्ठ पुलिस निरीक्षक अविराज कुराड़े के नेतृत्व में गांगुर्डे व उनकी टीम ने फ़ौरन होटल के कमरे में दबिश देकर संदिग्ध आरोपी को हिरासत में ले लिया. पुलिस दल द्वारा कमरे की तलाशी के दौरान आरोपी के पास से 4 देशी कट्टा और 8 जिंदा कारतूस बरामद हुआ. आरोपी की पहचान परमानंद म्हात्रे निवासी नागपुर के रूप में हुई है.

Scanned with OKEN Scanner

The Times of India

# Over ₹3.5 crore seized from ATM cash van

**Mumbai:** In the second major cash confiscation ahead of assembly polls, over Rs 3.5 crore was seized from an ATM van in Nalasopara on Thursday. Two men aboard, including the vehicle operator, could only provide documentation for Rs 40 lakh.

The two said the cash was for ATMs of private banks. Police contacted the bank and cash transport agency to verify. Members of Bahujan Vikas Aghadi have sought action against responsible parties. TNN

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal

# Nagpur man held with pistols in Kashimira

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Less than three days after busting an inter-state arms supply cartel, the crime branch unit (zone I) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) arrested a Nagpur-based man who was found in possession of illegal firearms in Kashimira on Wednesday.

According to the police, the accused Parmanand Naresh Mhatre, 27, who was arrested from a room in Hotel Western had four country-made pistols and eight live cartridges worth more than Rs2.08 lakh.

Mhatre, who works as a labourer in Nagpur had checked into the hotel a few hours before he was arrested, police said. The barrel length and bore of the pistols measured 15cm and 1cm, respectively. "The accused seems to be just a carrier who was hired to deliver the arms. Investigations were underway to ascertain the source of the firearms and its potential buyers," said a senior police official.

Meanwhile, an offence has been registered at the Kashigaon police station under the relevant sections of the Arms Act and Maharashtra Police Act against Mhatre who has been remanded to custody. It may be recalled that eight people including arm suppliers and buyers were recently arrested from various states by the MBVV police.

Hindustan Times

# ₹5 cr unaccounted cash seized by cops

**Megha Sood**
megha.sood@htlive.com

**MUMBAI:** The Mira-Bhayander-Vasai-Virar (MBVV) police on Thursday seized unaccounted cash worth ₹5 crore from three vehicles during a nakabandi operation ahead of the upcoming assembly elections on November 20.

In the first incident, Nalasopara police intercepted a van carrying ₹3.5 crore in ATM cash. The vehicle, displaying CMS's logo, was stopped on suspicion during the nakabandi. Upon inspecting the metal suitcases in the van, officers discovered the cash, which lacked supporting documentation. "There were no legal documents substantiating the transfer of the cash," a police officer said. "We are now investigating whether the money was intended for election-related activities, which would be illegal under the code of conduct," the officer added.

In the second incident, Mandvi police detained another van from the same company on the Mumbai-Ahmedabad Highway, seizing ₹2.80 crore in cash.

The third case involved a small tempo intercepted by the Naya Nagar police station on Mira Road at 5 pm on Thursday. Police officers seized ₹1 crore in cash from the tempo, which belonged to a private company.



Scanned with OKEN Scanner